APJ हाऊस, चर्चगेट मुंबई येथील पाचव्या व सहाव्या मजल्यावरील ४ महाराष्ट्र राज्य सहकार न्यायालये व २ सहकार अपिल न्यायालयात आणि तिसऱ्या मजल्यावरील बार रुम येथे वातानुकुलित यंत्रणा बसविण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी- २०१९/प्र.क्र.४७-अ/२२ स,
मंत्रालय (वि), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ३१.०३.२०१९.

<u>वाचा</u>: शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. पुनवि- २०१९/ प्र.क्र. १८ /१९/१७-स, दि. ३१.३.२०१९.

<u>शासन निर्णय :-</u>

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ३१.१.२०१९ व निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांनी दि.२१.२.२०१९ ,दि.२२.३.२०१९ तसेच, दि. ३०.३.२०१९ च्या पत्रान्वये APJ हाऊस चर्चगेट मुंबई येथील पाचव्या व सहाव्या मजल्यावरील ४ महाराष्ट्र राज्य सहकार न्यायालय व २ सहकार अपिल न्यायालयात आणि तिसऱ्या मजल्यावरील बार रुम येथे वातानुकुलित यंत्रणा बसविण्यासाठी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यकारी अभियंता,दक्षिण मुंबई विद्युत , सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी साक्षांकित केले आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने छाननीअंती सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने रु. ४७,१६,१४०/- (रुपये सत्तेचाळीस लाख सोळा हजार एकशे चाळीस फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील खर्च मागणी क्र. व्ही-२, २४२५- सहकार , ००१- संचालन व प्रशासन, (०१) (०९) महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय (अनिवार्य) (२४२५ ०१०२) १३- कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ साठी उपलब्ध तरतूदीतून सदर खर्च करण्यास, तसेच वित्त विभागाचे दि. ३१.१.२०१९ च्या शासन निर्णयातील अटी शिथील करुन वातानुकूलित यंत्रंणा बसविण्याच्या उद्देशाने सदर रक्कम रु.४७,१६,१४०/- इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास खालील अटींच्या आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

i) शासन परिपत्रक, क्र.मुंविनि/२०१७ /प्र.क्र.१७/विनियम/दि.१८.१२.२०१७ मधील सुचनेनुसार २४२५०१०२ या लेखाशिर्षाखालील दि.२८.०२.२०१९ यापूर्वीची तपशिलवार देयके प्रलंबित नाहीत.

ii) दि.२८.०२.२०१९ नंतरच्या तपशिलवार देयकांचा त्वरेने निपटारा करण्यात येईल.

iii) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

iv) खर्च नियमित देयकाव्दारे शक्य नसून संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

v) या संक्षिप्त देयकाचे तपशिलव्दार देयक विहित मुदतीत सादर करण्याची जबाबदारी निबंधक व आहरण व संवितरण अधिकारी महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांची राहिल.

vi) मासिक निधी विवरण पत्रानुसार या करिता निधी उपलब्ध आहे.

३. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम रु. ४७,१६,१४०/- (रुपये सत्तेचाळीस लाख सोळा हजार एकशे चाळीस फक्त) खर्च करण्यासाठी निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांना "**आहरण व संवितरण अधिकारी**" म्हणून आणि मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई यांना "**नियंत्रक अधिकारी**" म्हणून घोषित करण्यात येत आहे

४. सदर शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५७/१९ इमा-२ दि.१३.०२.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र.१९४/२०१९व्यय-२, दि.३१.०३.२०१९, क्र. २२६/२०१९/व्यय-२, दि.३१.०३.२०१९, क्र. १८७/२०१९/कोषा-प्रशा-५, दि. ३१.०३.२०१९ व अनौपचारिक संदर्भ क्र. १६७/२०१९/विनियम, दि. ३१.०३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३११२२३०४३५१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b7779146441b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.04.04 16:18:29 +05'30'

(राजू नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव,
२. मा. प्रधान सचिव (सहकार),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय, मुंबई,
३. सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे,
४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई,
५. निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
७. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१०. अवर सचिव तथा विशेष कार्य अधिकारी, कार्यासन २-स, सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
११. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई
१२. वित्त विभाग, व्यय-२/ कराधान-३/ अर्थसंकल्प-३/ अर्थसंकल्प-१२/विनियम/कोषा-प्रशा-५ ,
१३. सर्व अधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
१४. अवर सचिव (अर्थसंकल्प), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई,
१५. निवडसंग्रह (२२-स).